महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

**मासं/रवका/न.क्र.०५/०९९२३**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१४१
दिनांक: **२०.०३.२०२६**

# परिपत्रक

**विषय:** सन २०२६ करिता एम्प्लॉई पोर्टल प्रणालीद्वारे 'दीर्घ सेवाकालावधी विकल्प' (Long Tenure Option) सादर करणेबाबत.

**संदर्भ:** १. प्रशासकीय परिपत्रक क्र.६७३ दि.२४.०६.२०२४.
२. प्रशासकीय परिपत्रक क्र.६९२ दि.०९.०४.२०२५.
३. परिपत्रक क्र.मासं/रवका/न.क्र.०५/११२९२ दि.०९.०४.२०२५.

****

कंपनीमध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता दरवर्षी सर्वसाधारण बदल्या व विनंती बदल्यांबाबतचे धोरण राबविण्यात येते. दीर्घ सेवा कालावधी निकषांतर्गत होणाऱ्या बदल्यांप्रकरणी व एकाच परिक्षेत्रात दीर्घकाळ सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी बदलीबाबतचा विनंती पर्याय सादर करण्याकरीता "दीर्घ सेवाकालावधी विकल्प" (Long Tenure Option) या नविन अर्जाची रचना करून "एम्प्लॉई पोर्टल" मध्ये "अर्ज" (Application) या पर्यायाखाली उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र.६९२ दि.०९.०४.२०२५ अन्वये बदली धोरणाबाबतच्या सर्व सविस्तर सूचना एकत्रित करून यापूर्वीच निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. या अनुषंगाने सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सन २०२६ करीता सर्वसाधारण बदली धोरणानुसार दीर्घ सेवाकालावधी निकषांतर्गत जे अधिकारी व कर्मचारी परिमंडळाबाहेर बदलीसाठी विचाराधीन क्षेत्रामध्ये (Zone of Consideration) येतात, अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांनी नोंदणी केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल वर दि.१५.०३.२०२६ पर्यंत लघुसंदेश/सूचना पाठविण्यात येईल. संबंधित कर्मचाऱ्यांनी सदरचा लघुसंदेश/सूचना प्राप्त झाल्यापासून ०५ दिवसांच्या आत आपला 'दीर्घ सेवाकालावधी विकल्प' अर्ज एम्प्लॉई पोर्टल प्रणालीव्दारे सादर करणे आवश्यक आहे.

३. सबब, 'दीर्घ सेवाकालावधी विकल्प' अर्ज सादर करीत असतांना संदर्भ क्र.३ मधील परिपत्रकातील मार्गदर्शक सूचना विचारात घेउन विकल्प अर्ज सादर करावेत. तसेच गट-१ (Category-I) किंवा अन्य अत्यंतिक गंभीर स्वरूपाच्या आजाराकरीता गट-४ (Category-IV) अंतर्गत सन २०२६ या बदली वर्षाकरीता बदलीपासून सूट घ्यावयाची आहे अथवा विनंती बदली अर्ज सादर करावयाचा आहे अशा प्रकरणी त्या त्या बदली वर्षाच्या ०१ जानेवारी नंतरचे जिल्हा शल्य चिकीत्सकाचे प्रमाणपत्र (Civil Surgeon Certificate) व मागील एक वर्षातील औषधाबाबतची कागदपत्रे (Recent Medical Prescriptions) सादर करणे बंधनकारक राहील.

४. तसेच मासं/मपुक/३०५०५ दि.२२ सप्टेंबर २०२५ अन्वये पारीत करण्यात आलेल्या सूचनांनुसार क्षेत्रीय कार्यालयांच्या पुनर्रचनेनुसार कर्मचाऱ्यांच्या कामात/पदस्थापनेमध्ये बदल केले असल्यास आणि प्रकरणपरत्वे त्यांचे मुख्यालय/शाखा/उपविभाग/विभाग अथवा मंडल कार्यालय यामध्ये बदल झाला नसल्यास संबंधित कर्मचाऱ्यांचा सदरचा कालावधी बदली धोरणामध्ये विहित करण्यात आलेल्या दिर्घ कालावधीची गणना करण्याकरीता विचारात घेण्यात यावा.

५.	त्याचप्रमाणे सर्व मुख्य अभियंता व सांघिक कार्यालयातील समकक्ष अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, प्रशासकीय बदलीबाबत आपल्या कार्यक्षेत्रात काही प्रस्ताव असल्यास असे सर्व प्रस्ताव दि.१५.०४.२०२६ पर्यंत प्रणालीमार्फत सादर करावेत. तसेच, प्रशासकीय बदलीचे प्रस्ताव सादर करतांना कार्यालयांच्या दैनंदिन कामकाजावर विपरीत परिणाम होणार नाही, याबाबतची दक्षता घ्यावी. सबब, नियंत्रण अधिकारी यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

६.	सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

( भूषण कुलकर्णी )
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(मासं)/(प्रकल्प)/(वाणिज्य) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (वित्त व लेखा)/(वितरण)/(पायाभूत आराखडा/विशेष प्रकल्प)/(मासं)/(सुवअं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

**मासं/रवका/न.क्र.०५/१०३७७**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१४१
दिनांक: **२४.०३.२०२६**

# शुध्दीपत्रक

**विषय:** सन २०२६ करिता एम्प्लॉई पोर्टल प्रणालीद्वारे 'दीर्घ सेवाकालावधी विकल्प' (Long Tenure Option) सादर करणेबाबत.

**संदर्भ:** परिपत्रक क्र.मासं/रवका/न.क्र.०५/०९९२३ दि.२०.०३.२०२४.

****

सन २०२६ करीता सर्वसाधारण बदली धोरणानुसार दीर्घ सेवाकालावधी निकषांतर्गत जे अधिकारी व कर्मचारी परिमंडळाबाहेर बदलीसाठी विचाराधीन क्षेत्रामध्ये (Zone of Consideration) येतात, त्यांनी 'दीर्घ सेवाकालावधी विकल्प' अर्ज एम्प्लॉई पोर्टल प्रणालीव्दारे सादर करणे बाबतच्या सूचना संदर्भिय परिपत्रकाव्दारे निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. आता, संदर्भिय परिपत्रकातील परिच्छेद क्र.२ खालीलप्रमाणे वाचण्यात यावा.

'या अनुषंगाने सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सन २०२६ करीता सर्वसाधारण बदली धोरणानुसार दीर्घ सेवाकालावधी निकषांतर्गत जे अधिकारी व कर्मचारी परिमंडळाबाहेर बदलीसाठी विचाराधीन क्षेत्रामध्ये (Zone of Consideration) येतात, अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांनी नोंदणी केलेला भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल वर लघुसंदेश/सूचना पाठविण्यात येईल. अशा सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सदरचा लघुसंदेश/सूचना प्राप्त झाल्यानंतर दि.१५.०४.२०२६ पर्यंत आपला 'दीर्घ सेवाकालावधी विकल्प' अर्ज एम्प्लॉई पोर्टल प्रणालीव्दारे सादर करावा.'

३. संदर्भिय परिपत्रकातील इतर सूचना अबाधित राहतील.

४. सदर शुध्दीपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**( भूषण कुलकर्णी )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(मासं)/(प्रकल्प)/(वाणिज्य) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (वित्त व लेखा)/(वितरण)/(पायाभूत आराखडा/विशेष प्रकल्प)/(मासं)/(सुवअं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.